परिवहन समितीच्या मंगळवार दि. ०८/०५/२०१८ रोजी दुपारी ०३:०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सदस्य

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | सभापती |
| 2 | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 3 | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 4 | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 5 | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 6 | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 7 | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 8 | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 9 | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 10 | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 11 | मा. सौ. विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 12 | मा. श्री. विरेन्द्र घनश्यामदास कुकरेजा<br>सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य | सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | श्री. शिवाजी जगताप | परिवहन व्यवस्थापक |
| 2 | श्री. हरिश दुबे | निगम सचिव |

मा.सभापती, परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

तद्नंतर परिवहन व्यवस्थापक यांनी परिवहन विभागाचे सन २०१८–१९ या वर्षाचे स्वतंत्र अर्थसंकल्प ‘ब’ समितीला सादर केले आणि अर्थसंकल्पाचे वाचन केले.

ठराव क्रमांक 50 :– नागपूर महानगर पालिका नागपूर परिवहन विभागातर्फे परिवहन सेवा जी.सी.सी. तत्वावर सुरु करण्यात आलेली असून महानगर पालिका अधिनियमांतर्गत कलम ९७ व ९८ अन्वये परिवहन विभागाचे स्वतंत्र अर्थसंकल्प 'ब' ८ तयार करण्याबाबत चे तरतुदीनुसार सन २०१७–१८ चे सुधारित अंदाज पत्रक व २०१८–१९ वार्षिक अंदाज पत्रक तयार करण्यात आले आहे.

सन २०१८–१९ या वर्षाचे अर्थसंकल्प 'ब' यास मान्यता देण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेवून परिवहन समितीच्या सन २०१७–२०१८ परिवहन व्यवस्थापक यांचेद्वारे सादर केलेल्या सुधारित व सन २०१८–२०१९ चे प्रस्तावित अंदाजपत्रकात दुरूस्ती व फेरबदल तसेच म.न.पा. महासभेने स्वीकृत सन २०१७–१८ स्तंभा मधील मुद्रणातील दुरूस्ती करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, परिवहन समिती यांना देण्यास ही परिवहन समिती एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच केलेल्या दुरूस्ती व फेरबदलास मा. स्थायी समिती मार्फत महासभेसमोर अंतिम मंजुरीसाठी शिफारस करण्यास्तव पाठविण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, परिवहन समिती यांना देण्यास समिती एकमताने मंजुरी प्रदान करीत आहे.

ठराव क्रमांक 51 :– परिवहन विभाग, मनपा च्या आर्थिक वर्ष २०१७–१८ मध्ये मनपा निधीतुन रु. १०८ कोटी निधी मंजुर करण्यात आला असुन NMC The City Of Nagpur Transport Fund, या बँक ऑफ महाराष्ट्र, सिव्हील लाईन्स, नागपूर च्या Current Account मध्ये माहे मार्च २०१८ रु. ४,५७,३२,५५६/– तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी मार्च २०१८ एकुण रु. ७,२३,३४,०९०/– हा विविध लेखा शिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चा चा लेखा जोखा परिवहन समिती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 52 :– परिवहन समिती ठराव क्र. १३, दि. ३१/०८/२०१७ अन्वये बॉयो – सी.एन.जी. इंधनावर संचलित २५ बसेसचे खरेदी संचालन व देखभाल व बॉयो – सी.एन.जी. चे उत्पादन करण्याकरीता कंत्राटदाराची नेमणुक करणे या एकिकृत प्रकल्पाची मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदर प्रकल्पकरीता अनुभवी तज्ञ सल्लागाराची नेमणुक करण्याकरीता निविदा प्रक्रिया केली असता मे. डी.आर.ए. हे एकमेव निविदाकार उपलब्ध झाले. मे. डी.आर.ए. यांनी एकीकृत प्रकल्पा करीता एकूण रू. ५५,४४,०००/–ची मागणी केलेली असून सदर रक्कम ही नियुक्त होणाऱ्या कंपनी/कंत्राटदारा मार्फत देय राहील. सदर रकमेस मा. आयुक्तांनी मान्यता प्रदान केलेली आहे.

करीता बॉयो – सी.एन.जी. एकीकृत प्रकल्पाकरीता सल्लागार म्हणून मे. डी.आर.ए. यांची नियुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**सभापतीः—**विषय क्र. 43 च्या अनुषंगाने अपहार प्रकरणी लिप्त असलेले वाहक, कंडक्टर यांच्यावर गुन्हा दाखल होत आहे. एक वाहक दुस—यांदा चोरी करतांना सापडला तर त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे, या सर्व बाबींचा अभ्यास करण्याकरिता एसओपी(SOP) ची प्रत समितीच्या सर्व सदस्यांना देण्यात यावी असे निर्देश देण्यात येतात. तसेच पुढच्या सभेत हा प्रस्ताव ठेवण्यांत यावा.

ठराव क्रमांक 53 :— श्री. सुकीर सोनटक्के, वाहतुक व्यवस्थापक यांना दि. १०/०४/२०१८ पासुन दि. ०९/१०/२०१८ पर्यंत या सहा महिन्याचा कालावधी करीता दरमाह रू. ३५,०००/— या मानधनावर मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्र. ५४ :— श्री.विरेंद्र कुकरेजा (अध्यक्ष,स्थायी समिती):श्री. मातकर यांच्या अनुषंगाने, महानगरपालिकेचा खासदार क्रीडा महोत्सव हा मोठा कार्यक्रम सुरू झाला. माझी अशी जानकारी आहे की श्री.मातकर यांना जी जबाबदारी देण्यात आली होती ती त्यांनी बरोबर पार पाडली नाही. काय अडचण झाली याच्यावर चर्चा केली पाहिजे., या सुचनेसह विषय विभागास परत पाठविण्यास परिवहन समितीने ऐकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 55 :— सहाय्यक लेखापाल म्हणुन श्री. अश्विन पाचपौर यांना दि. १६/०४/२०१८ ते दि. १५/१०/२०१८ पावेतो सहा महिन्याकरीता मंजुर रू. २०,०००/— या मानधनावर मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून उपसुचनेसह एकमताने मंजूरी प्रदान केली.

परिवहन व्यवस्थापकः—मा. सभापती परिवहन समिती यांचेकडे सादर झालेली उपसुचना खालील प्रमाणे आहे. मा. सभापती परिवहन समिती यांनी उपसुचना बैठकीत वाचन करावयाचे सुचित केल्यानुसार परिवहन व्यवस्थापक यांनी उपसुचनेचे वाचन केले.

‘‘श्रम अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी म्हणून श्री.अरूण पिपरूडे यांचा कार्यकाळ ठराव क्र. ४० अन्वये दि. ७.०४.२०१८ रोजी संपत असून व परिवहन विभागात अपूरा कर्मचारी वर्ग व श्री.अरूण पिपरूडे यांची आवश्यकता असल्याने एक दिवसाचा खंड देवून म्हणजेच दि. ०९.०४.२०१८ ते ८.१०.२०१८ पावेतो सहा महिन्याकरिता मंजूर रू. ३५,०००/— हजार या मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी.’’ सदर मुदतवाढ चा प्रश्न परिवहन समितीने विचारात घेवून या उपसुचनेस एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री. प्रविण भिसीकर — शहरबस वाहतुकीतीचा सोयीकरिता कामठी मार्गावर मौजा वांजरा ख.क्र. ५८/४ येथील खाजगी जागा भाडे तत्वावर घेण्याची कार्यवाही परिवहन विभागामार्फत करण्याची सुचना दिली

मा. सभापती – परिवहन विभागाने ताबडतोब उपरोक्त जागा भाडे तत्वावर घेण्याची कार्यवाही करावी.

श्री.नितीन साठवणे:– मा.सभापती, आमच्या प्रभागात बस थांबा शांतीनगर घाटाला लागून केलेला आहे. जेथे विसावा आहे त्याला लागूनच तयार केला आहे. हा बस थांबा चौकात केला तर उचित राहील.

सभापती:–मा.सदस्य आपण पत्र देवून टाकावे. मिश्रा यांना आदेश देण्यात यावे की त्यांनी याची चौकशी करून काम करावे. बस आगराच्या अनुषंगाने परिवहन व्यवस्थापक यांनी मौखीकरित्या विषय मांडावा.

परिवहन व्यवस्थापक:– मा.सभापती, बस आगारासाठी ७–८ जागेची मागणी होती त्यापैकी ४ जागा आल्या आहेत. काही कालावधीकरिता खाजगी जागेसाठी आराखडा तयार केल्यानंतर आपल्याला कामटी रोडवरती एक जागेची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे मिळाली आहे. जोपर्यंत डेपोची निर्मिती करण्यासाठी जागेची उपलब्धता होत नाही तोपर्यंत याबाबत मान्यता देण्यात यावी.

<u>ठराव क्रमांक 56</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
परिवहन समिती
महानगरपालिका,नागपूर